ग्रंथमालिका ‘गुरु’ : खंड १

# गुरूंचे महत्त्व

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्‍घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**आणि पू. संदीप गजानन आळशी**



**सनातन संस्था**




**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९६, गुजराती ६८, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**ऑगस्ट २०२४ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९७ लाख ३३ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २०.९.२०२४ पर्यंत १२८ साधक संत झाले, तर १,०४३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. देवता, साधना, राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्वनिष्ठ आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन !

७. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ ‘भारत गौरव पुरस्कार’ देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

---

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**१. गुरु** ८

१ अ. व्युत्पत्ती १ आ. व्याख्या आणि अर्थ ८

१ इ. इतिहास ९

१ ई. गुरूंचे स्वरूप १ उ. गुरुतत्त्व १०

**२. गुरूंचे महत्त्व** १०

२ अ. गुरुमहिमा २ आ. शिक्षणशास्त्रदृष्ट्या ११

२ इ. मानसशास्त्रदृष्ट्या २९

२ ई. अध्यात्मशास्त्रदृष्ट्या २९

२ ई १. गुरूंकडे जाणे २९

२ ई ३. गुरूंमुळे संकटांचे निवारण होणे ३०

२ ई ४. प्रारब्ध आणि गुरु ३०

२ ई ५. शिष्याला माध्यम न करता स्वयंप्रकाशी करणे ३२

२ ई ६. गुरूंच्या अस्तित्वाने शिष्याची उन्नती होणे ३४

२ ई ८. सिद्धींपासून दूर रहायला शिकवणे ३४

२ ई ९. गुरुकृपेने मिळालेल्या ज्ञानात ते ज्ञान समजण्याची शक्तीही त्याच वेळी गुरूंनी दिलेली असणे ३५

२ ई ११. गुरूंच्या प्रकारानुसार महत्त्व ३७

२ ई १२. गुरुप्राप्ती होण्याआधी आणि नंतरची शिष्याची उन्नती ३७

२ ई १७. गुरूंच्या प्रवचनाच्या वेळी ऋषीमुनी आणि देवता यांची उपस्थिती ४०

२ ई १८. देहत्यागानंतरही स्थुलातील अनुभूती देऊन शिकवणे ४०

२ ई १९. गुरूंचे आध्यात्मिक स्तरावरील महत्त्व सिद्ध करणारे वैज्ञानिक प्रयोग, तसेच साधकांनी केलेले सूक्ष्म परीक्षण ४०

卐 **गुरूंविषयी टीका वा अयोग्य विचार आणि त्यांचे खंडण !** ५७

卐 **प्रस्तुत ग्रंथाचे अध्यात्मशास्त्रीय परिभाषेतील सार !** ५९

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ६१

---

टीपा १. अध्यात्मविषयक सर्व ग्रंथांचे सामायिक मनोगत ‘धर्माचे मूलभूत विवेचन’ या ग्रंथात दिले आहे.

२. ग्रंथात साधकांनी लिहिलेल्या मजकुरात वा साधकांच्या अनुभूतींमध्ये ‘प.पू. डॉक्टर’, असा उल्लेख आला आहे, तो ग्रंथाचे संकलक परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्याविषयी आहे.

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

## मनोगत

सद्‌गुरुवांचूनी सांपडेना सोय । धरावे ते पाय आधी त्याचे ।
म्हणे ऐसें आंधळे हें जन । गेलें विसरून खऱ्या देवा ॥
**– जगद्‌गुरु तुकाराम महाराज**

सध्या बहुतेकांचे दैनंदिन जीवन धावपळ आणि कटकटी यांनी ग्रासलेले आहे. जीवनात मनःशांती आणि आनंद मिळवण्यासाठी साधना कोणती आणि नेमकी कशी करावी, याचे यथार्थ ज्ञान देतात, ते गुरु ! तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे आज समाज मात्र गुरूंचे महत्त्व विसरत चालला आहे. या ग्रंथात वर्णिलेली गुरुमहती वाचून जिज्ञासू अन् साधक यांची गुरूंविषयी श्रद्धा निर्माण होईल.

शिष्याच्या जीवनात गुरूंचे महत्त्व अनन्यसाधारण आहे; कारण गुरूंविना त्याला ईश्वरप्राप्ती होऊच शकत नाही. गुरूंचे भक्तवत्सल रूप, दयाळू दृष्टी, शिष्यावर कृपा करण्याची माध्यमे इत्यादी नानाविध पैलूंद्वारे शिष्याला गुरूंच्या अंतरंगाचे खरे दर्शन या ग्रंथातून घडेल. यामुळे शिष्याची गुरूंविषयीची भक्ती दृढ होईल आणि त्याला गुरूंच्या अस्तित्वाचा अधिकाधिक लाभ करून घेता येईल.

शिष्याला गुरूंचे महत्त्व पटलेले असते; कारण त्याला गुरूंमधील आध्यात्मिक सामर्थ्याची प्रचीती आलेली असते. सध्याच्या विज्ञानयुगातील सर्वसामान्य व्यक्तीला मात्र प्रत्येक गोष्ट वैज्ञानिक कसोटीवर सिद्ध केली असेल, तरच ती खरी वाटते ! त्यामुळेच तिचा अध्यात्मावर विश्वास बसून ती साधनेला लागते. यासाठी आम्ही आमचे गुरु प.पू. भक्तराज महाराज यांच्या छायाचित्राच्या संदर्भात ‘पी.आय.पी.’ या वैज्ञानिक प्रणालीचा उपयोग करून विविध प्रयोग केले. विज्ञानाच्या आधारेही गुरूंचे श्रेष्ठत्व कसे सिद्ध होते, याविषयीचे नाविन्यपूर्ण विवेचन, हे या ग्रंथाचे एक आगळे वैशिष्ट्य आहे.

या ग्रंथातील मार्गदर्शनामुळे जिज्ञासूंचे साधकांत, साधकांचे शिष्यांत अन् शिष्यांचे गुरूंमध्ये रूपांतर व्हावे, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**